कौशल्य विकास • नोकरीबरोबरच उद्योगवाढीसाठी मदत, प्रात्यक्षिकांतूनच अनुभव

# ४ उद्योगाभिमुख अभ्यासक्रमाद्वारे संधी

प्रतिनिधी | नाशिक

केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणाचे सृजनशील विकेंद्रीकरणाचे ध्येय साध्यण्यासाठी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने एक ठोस पाउल टाकले आहे. संस्थेत उद्योगाभिमुख चार नवीन कोर्सेस सुरू करण्यात आले आहे.

हीटिंग, व्हेंटिलेशन अँड एअर कंडिशनिंग, इंडस्ट्रियल ऑटोमेशन, लीन मॅन्युफॅक्चरिंग अँड मॅनेजमेंट, 'क्वांटम कॉम्प्युटिंग' हे कोर्स करतानाच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे प्रत्यक्ष कंपनीत काम करण्याचाही अनुभव मिळेल. त्यामुळे पदवी पूर्ण होताच हे इंजिनिअर चार वर्षांचा अनुभव घेऊनच बाहेर पडणार असल्याने त्यांना कंपन्यांमध्ये लागलीच मोठ्या पगाराची नोकरी मिळण्यासह स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करता येईल, असा विश्वास महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. केशव नांदूरकर यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ म्हणाले, औद्योगिक क्षेत्रात मोठा अनुभव असलेल्या तज्ज्ञ इंजिनिअर्सनी आखलेले हे कोर्सेस याच क्षेत्रातील तज्ज्ञ स्वतः शिकवणार आहेत. त्यामुळे ज्या बाबी उद्योग व कंपन्यांमध्ये शिकण्यास मिळणार नाही, अशा बाबींचाही अनुभव या विद्यार्थ्यांकडे असेल. उद्योजक नीलेश साळगावकर यांनी सांगितले, औद्योगिक क्षेत्रात लागणारे ज्ञान, कौशल्ये आणि शैक्षणिक अभ्यासक्रम यातील मोठे अंतर भरून करण्यासाठी अशा नवीन अभ्यासक्रमाची गरज आहे. रोबोटिक्स अँड ऑटोमेशन विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्माकर पवार म्हणाले की 'उत्पादन क्षेत्राच्या सर्व विभागांमध्ये लीन मॅनेजमेंट या विषयाचा वाढता वापर आहे. हा कोर्स प्रामुख्याने उत्पादकता वृद्धीची जपानमध्ये विकसित झालेली तंत्रे विद्यार्थ्यांना शिकवेल. हे ज्ञान असलेल्या विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात मोठी मागणी आहे आणि ती यापुढे अधिक वाढत जाणार आहे.

## तज्ज्ञांद्वारे नव्या अभ्यासक्रमांची रचना, विद्यार्थ्यांना फायदा

नवीन शिक्षण धोरणात अभिप्रेत असलेल्या प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस या पदावर तज्ज्ञ लोकांची नेमणूक करणाऱ्या देशातील महाविद्यालयांपैकी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय हे एक आहे. डॉ. उदय वाड, जयंत कुलकर्णी, सुरेश दीडमिशे आणि अनिल आहेर या चार तज्ज्ञ अभियंत्यांनी या कोर्सेसचे औद्योगिक क्षेत्रासाठी असलेले महत्त्व विशद केले. उद्योगाभिमुख अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले असून, गुणवत्तेतील कोणताही तडजोड न करता त्यांची रचना करण्यात आली आहे.